# प्रेसनोट

## दि.१७.१०.२०२१ रोजी होणाऱ्या पुणे लोहमार्ग पोलीस भरतीतील लेखी परीक्षेबाबत.

दि.१७/१०/२०२१ रोजी पोलीस आयुक्त पुणे शहर, पिंपरी चिंचवड, सोलापुर व पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, सातारा, सांगली, कोल्हापुर, अहमदनगर याठिकाणी ७१,९७२ उमेदवारांची लेखी परीक्षा १ तास ३० मिनिटांची होणार असुन त्यांचे प्रवेशपत्र पुणे लोहमार्ग पोलीस भरती वेबसाईट https://mahapolicebharti2019.in वर जावुन डाउनलोड करून घ्यावे. परीक्षेच्या वेळेस उमेदवारांचा चेहरा व दोन्ही हाताने धरलेले प्रवेशपत्र याचा एकुण तीन ठिकाणी फोटो घेण्यात येणार असुन परीक्षा केंद्रात प्रवेश करतेवेळी, परीक्षेस बसलेल्या अवस्थेत व पेपर देताना फोटो घेतले जाणार आहे. तसेच व्हिडीओ रेकॉर्डींग केली जाणार आहे.

सदरवेळी उमेदवारांचे फ्रीस्कींग करून अधिकृत करण्यात आलेले ओळखपत्र, प्रवेशपत्र हे चेक केल्यानंतरच उमेदवारास परीक्षा केंद्रात सोडले जाईल.

परीक्षा चालु असताना कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक उपकरणे जसे की, मोबाईल, ब्लुटुथ डिव्हाइस, हेडफोन्स, चष्म्यातील कॅमेरे, डिजीटल घडयाळे, अंगठया यांचा वापर करणे निषेध आहे.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर भरारी पथके, सर्व्हेलन्स पथके देखरेख ठेवणार असुन, कोरी उत्तर पत्रिका देणारे व त्यावर सही न करणाऱ्या उमेदवारांवर व गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांवर भारतीय दंड संहिते प्रमाणे कायदेशिर कडक कारवाई करण्यात येईल. तसेच सदरील उमेदवारांवर आजीवन परीक्षाबंदी केली जाईल.

सर्व जिल्हयातील इलेक्ट्रॉनिक मिडीया, प्रिंट मिडीया व सजग नागरीकांना अवाहन करण्यात येते की, असे कुठलेही गैरप्रकार आढळुन आल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा.

असे अवाहन श्री.सदानंद गं वायसे--पाटील, पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे व श्री.गणेश शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे यांनी केले आहे.

(सदानंद गं. वायसे-पाटील) भा.पो.से
पोलीस अधीक्षक,
लोहमार्ग पुणे.